

कोल्हापूर : 'यिन'तर्फे कमला महाविद्यालयात झालेल्या 'यिन' संवाद कार्यक्रमात बोलताना वरिष्ठ न्यायाधीश उमेशचंद्र मोरे. शेजारी प्रा. वर्षा साठे, डॉ. अनघा पाठक, प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. अनिल घस्ते, प्रा. रेखा पंडित. समोर उपस्थित विद्यार्थिनी.

# मुलींनी जागृत, आत्मनिर्भर व्हावे

## उमेशचंद्र मोरे; कमला महाविद्यालयात यिन संवाद कार्यक्रम

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

जागतिक महिला दिवस दररोज करायला हवा. मुलींनो, विचार करा. स्वत:च्या शरीराची काळजी घ्या. पुरुषी मानसिकतेची शिकार बनू नका. लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना ठामपणे विरोध करा. सामर्थ्यशाली बना.
– उमेशचंद्र मोरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : ''मुलींनो, जागृत व्हा. सतत सावध व आत्मनिर्भर व्हा. तुम्हाला सामर्थ्यशाली बनायचे आहे. मित्र-मैत्रिणींची संगत महत्त्वाची आहे, हे लक्षात ठेवा. ९० टक्के लैंगिक छळ हा जवळच्या लोकांकडूनच होत असतो. लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना ठामपणे विरोध करा. सामर्थ्यशाली बना. तुम्ही जिंकलात की, समोरचा असे नीच कृत्य करण्याचे धाडस करणार नाही,'' असे प्रतिपादन वरिष्ठ न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेशचंद्र मोरे यांनी केले.

डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशनच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात यिन संवाद कार्यक्रम झाला. 'महिला अत्याचार आणि अँटी रॅगिंग' यावर विद्यार्थ्यांनींशी संवाद साधला. प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर अध्यक्षस्थानी होत्या.

न्यायाधीश मोरे म्हणाले, ''आजही महिला, मुलींना दुय्यम दर्जा दिला जातो. महिलांनी नतमस्तक व्हावे, अशी पुरुषांची विकृत मानसिकता समाजामध्ये आढळते. कोल्हापूर जिल्ह्यात मुली-मुलांचा जननदरात तफावत आढळते. अजूनही वंशाला मुलगाच हवा, अशी मानसिकता आहे. मुलींना, स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. याला पुरुषांबरोबर काही स्त्रियाही कारणीभूत आहेत. मुलींचा जननदर हा कमी आहे. तो वाढायला पाहिजे. मुलगा-मुलगी समानता असली पाहिजे. मुलीसुद्धा खूप कर्तृत्ववान आहेत, हे महत्त्वाचे. घरामध्ये आजही स्त्रीला शारीरिक, आर्थिक, मानसिक छळाला अजूनही सामोरे जावे लागते. सिनेमाच्या, व्हॉटस् ॲप, मोबाईलच्या माध्यमातून ही विकृती फोफावते आहे. भारतात सामाजिक न्यायाचे पतन होताना दिसत आहे.''

डॉ. अनघा पाठक यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वर्षा साठे यांनी आभार मानले. प्रा. अनिल घस्ते, प्रा. रेखा पंडित आदी उपस्थित होते. 'यिन'चे समन्वयक अवधूत गायकवाड, सूरज चव्हाण यांनी नियोजन केले.